**ठळक बातम्या**

- अमेरिकेचा दौरा आटोपून प्रधानमंत्री मायदेशी परत यायला रवाना
- आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची भूमिका निव्वळ तटस्थतेची नाही तर शांततेच्या समर्थनाची असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनवाढीच्या दरात किंचित घसरण **आणि**
- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा आज उत्तराखंडमधे हल्दवानी इथं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत समारोप

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपला दोन दिवसांचा अमेरिका दौरा आटपून आज मायदेशी परत यायला निघाले. या दौऱ्यात त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासह तिथल्या अनेक वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केली. अमेरिकेच्या गुप्तचर विभाग प्रमुख तुलसी गबार्ड, तसंच विविध आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या कंपन्यांच्या प्रमुखांशी मोदी यांनी चर्चा केली. ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर भारत-अमेरिके दरम्यानची ही पहिलीच द्विपक्षीय चर्चा होती. प्रधानमंत्री मोदी यांच्या अमेरिका भेटीत दोन्ही देशांमध्ये व्यापार, उद्योग, संरक्षण आणि सुरक्षा, ऊर्जा, तसंच दोन्ही देशांच्या नागरिकांमधल्या परस्पर संबंधांसह विविध मुद्द्यांवर उच्च स्तरीय द्विपक्षीय चर्चा झाली. भारत-मध्यपूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर प्रकल्पावर एकत्रितपणे काम करण्यावर दोन्ही देशांमध्ये यावेळी सहमती झाली.प्रधानमंत्री मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात काल व्हाईट हाऊस मध्ये झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त निवेदन जारी केलं. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची भूमिका निव्वळ तटस्थतेची नसून,

शांततेच्या समर्थनाची असल्याचं मोदी यांनी यावेळी स्पष्ट केलं. यावेळी दोन्ही देशांमध्ये १६ वर्षांपूर्वी झालेल्या ऐतिहासिक नागरी अणु करारा अंतर्गत, भारतात अमेरिकी संरचनेच्या अणुभट्ट्यांची निर्मिती करण्याच्या दिशेने पुढे जाण्यावर दोन्ही नेत्यांमध्ये सहमती झाली. मुंबई दहशतवादी हल्ल्यासारख्या कारवाया रोखण्यासाठी अल-कायदा, आयसिस (ISIS), जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तय्यबा यासारख्या दहशतवादी गटांविरोधात सहकार्य मजबूत करण्यासाठी वचनबद्ध राहण्याचा दोन्ही नेत्यांनी यावेळी संकल्प केला. देशाच्या नागरिकांचं नुकसान करणाऱ्यांना शासन करण्याची सामायिक गरज लक्षात घेता, मुंबई हल्ल्यांमधला आरोपी, तहव्वुर राणाचं भारताला प्रत्यार्पण करायला अमेरिकेनं मंजुरी दिली. पाकिस्ताननं आपल्या भूमीचा वापर दहशतवादी कारवायांसाठी होणार नाही याची काळजी घ्यावी, असं आवाहन दोन्ही नेत्यांनी केलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उद्योगपती गौतम अदानी यांच्याशी संबंधित भ्रष्टाचार प्रकरण दडपत असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. प्रधानमंत्र्यांना देशात प्रश्न विचारले जातात, तेव्हा ते मौन बाळगतात, आणि परदेशात विचारले जातात तेव्हा ती वैयक्तिक बाब असल्याचं सांगतात. मोदी यांनी अमेरिकेतही अदानींच्या भ्रष्टाचारावर पांघरूण घातलं आहे, असं राहुल गांधी यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

संपूर्ण जग आज पर्यावरणापुढल्या संकटाचा सामना करत असून भगवान गौतम बुद्धांची शिकवण हाच यावरचा उपाय आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. थायलंड इथं आयोजित संवाद कार्यक्रमाला त्यांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित केलं. भगवान बुद्ध यांचा संयमाचा विचार जागतिक आव्हानाला सामोरं जाताना आपल्यासाठी मार्गदर्शक ठरतो, असं ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

२०१९ च्या पुलवामा हल्ल्यात वीरमरण आलेल्या जवानांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली. या जवानांचं बलिदान आणि देशाप्रति असलेलं त्यांचं समर्पण येणाऱ्या पिढ्या कधीच विसरणार नाहीत, असं प्रधानमंत्री म्हणाले. २०१९ ला आजच्या दिवशी जम्मू काश्मीरमधल्या पुलवामा इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलीस दलाचे ४० जवान शहीद झाले होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही समाजमाध्यमावर पुलवामा हल्ल्यातल्या शाहिद जवानांना आदरांजली वाहिली.

<><><><><>

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनवाढीच्या दरात किंचित घसरण झाली असून जानेवारी महिन्यात तो २ पूर्णांक ३१ शतांश टक्क्यांवर आला. डिसेंबर २०२४ मधे तो २ पूर्णांक ३७ शतांश टक्के होता. कांदे बटाटे वगळता, भाज्या आणि खाद्यपदार्थांच्या किमतीत तसंच इंधनाच्या किमतीत काहीशी घसरण झाल्यामुळे महागाई निवळल्याचं सरकारी आकडेवारीत म्हटलं आहे.

<><><><><>

न्यू इंडिया सहकारी बँकेवर रिझर्व्ह बँकेनं काल अनेक निर्बंध घातले. यामुळे बँकेला बचत खातं, चालू खातं किंवा ठेवीदाराच्या इतर कुठल्याही खात्यातून रक्कम काढता येणार नाही. रिझर्व्ह बँकेच्या अटींच्या अधीन राहून कर्ज फेड करता येईल, मात्र १३ फेब्रुवारीपासून नवीन कर्ज देता येणार नाही किंवा गुंतवणूक करता येणार नाही. तसंच हे निर्बंध पुढले सहा महिने लागू राहतील, असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

<><><><><>

समाजमाध्यमांवर वादग्रस्त वक्तव्य केल्याबद्दल रणवीर अलाहाबादियावर दाखल झालेल्या एफ आय आरच्या विरोधात त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव

घेतली आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजीव कुमार यांच्या खंडपीठाने त्याच्या याचिकेवर आज तातडीने सुनावणी करायला नकार दिला असून क्रमानुसार येत्या २ -३ दिवसात याचिकेवर सुनावणी करु असं सांगितलं. अलाहाबादिया आणि इंडियाज गॉट लॅटेन्ट या कार्यक्रमाचा निर्माता समय रैना यांना आसाम पोलिसांनी चौकशीसाठी हजर व्हायला सांगितलं आहे. महाराष्ट्र पोलिसांच्या सायबर विभागानेदेखील माहिती तंत्रज्ञान विषयक कायद्याखाली त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून संबंधित कार्यक्रम यू ट्यूबवरुन हटवण्याचे निर्देश दिले आहेत.रणवीर विरुद्ध इंदोरमधेही पोलीस तक्रार दाखल झाली आहे.

**<><><><><>**

‘ब्रिक्स’ देशांनी डॉलरची स्पर्धा करणारं चलन सुरु केलं, तर या राष्ट्र समूहाचं अस्तित्व नष्ट होईल, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. तसंच ‘ब्रिक्स’ समूहातला एखादा देश ही योजना घेऊन पुढे गेला, तर अमेरिका त्या देशावर १०० टक्के आयात शुल्क आकारेल, असं त्यांनी म्हटलं आहे. जगातल्या इतर देशांनी आकारलेल्या आयात शुल्काशी जुळणाऱ्या दरांचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देणाऱ्या ठरावावर नुकतीच ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर ते बोलत होते. ब्रिक्स समूहाच्या सदस्य देशांना सामायिक चलनाच्या मुद्यावर चर्चा करण्यात स्वारस्य नसून, ब्रिक्सचा संस्थापक सदस्य असलेल्या भारतानं यापूर्वीच ही कल्पना नाकारल्याचा दावा ट्रम्प यांनी यावेळी केला.

‘ब्रिक्स’ राष्ट्र समूहात सुरुवातीपासून ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांचा समावेश होता. अलीकडेच त्यामध्ये इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, इराण आणि UAE, या देशांचा समावेश करण्यात आला, तर अल्जेरिया, नायजेरिया आणि तुर्की, यासारख्या इतर अनेक देशांना ‘भागीदार देश’ असा दर्जा आहे.

**<><><><><>**

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा समारोप उत्तराखंडमधल्या हल्दवानी इथं आज होत आहे. दुपारी होणाऱ्या समारोप समारंभात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, केंद्रीय क्रीडा आणि युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे आणि ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांची या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती असेल.

यंदाच्या क्रीडा स्पर्धेत देशभरातल्या खेळाडूंनी १ हजार ५२३ पदकांची लयलूट केली. यात ४५७ सुवर्ण, ४५५ रौप्य आणि ६११ कांस्य पदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत सेना दल संघ पहिल्या क्रमांकावर आहे. ६८ सुवर्ण, २६ रौप्य आणि २७ कांस्य पदकांसह त्यांनी एकूण १२१ पदकं जिंकली आहेत. महाराष्ट्रानं सर्वात जास्त १९८ पदकं जिंकली आहेत, यात ५४ सुवर्ण, ७१ रौप्य आणि ७३ कांस्य पदकांचा समावेश आहे. हरियाणा ४८ सुवर्ण, ४७ रौप्य आणि ५८ कांस्य पदकांसह एकूण १५३ पदकं जिंकून तिसऱ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने बक्षिसाच्या रकमेत ५३ टक्क्यांची वाढ केली आहे. त्यामुळे या करंडक विजेत्या संघाला २० लाख २४ हजार अमेरिकन डॉलर्सची रोख बक्षिसं दिली जाणार आहेत. तर उपविजेत्या संघाला १० लाख १२ हजार अमेरिकन डॉलर्स किमतीची बक्षिसं दिली जातील.

**//<><><><><>//**